**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – मंदार प्रविणकुमार राणे

वय – ३२ वर्षे

व्यवसाय – नोकरी

रा/ने – वायंगवडे, ता. मालवण, जि. सिंधुदूर्ग.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू**

१. दि. ०३/११/२०२३ रोजी पोलीसांनी मला बोट जप्तीसाठी शासकीय पंच म्हणून बोलविले होते. त्यानुसार मी त्या ठिकाणी गेलो होतो. सुरवातीला मी पोलीस स्टेशन येथे आलो. त्यानंतर पोलीसांसोबत तळाशिल येथे गेलो. त्या ठिकाणी माझ्या समक्ष पंचनामा करण्यात आला. बोटी उभा असलेली जागा घन:श्याम कांदळगावकर यांनी दाखविली. आमच्या समक्ष बोटी जप्त केल्या त्याचा पंचनामा केला. जप्त केल्यानंतर जप्त केलेल्या बोटी पोलीस पाटील यांच्याकडे सुपुर्द केल्या. एकूण चार बोटी होत्या. त्यामध्ये घन:श्याम कृपा ही एक बोट होती. त्याचा क्र. एलएच०५एनएम३९६६ असा होता. दुसरी बोटीचे नाव मंडोदरी असे होते. त्याचा रंग केशरी रंगाचा बाण असलेली पांढरट रंगाची होती. तिची क्र. एमएच–०५एमएम३०९० असा होता. तिसऱ्या बोटीचे नाव लक्ष्मी–२८ असे होते. तिचा क्र. एमएच०५एमएम२६ असा होता. तसेच चौथ्या बोटीचे नाव वैभवी–५ असे होते. त्याचा क्र. एमएच०५एमएम३४७० असा होता. साक्षीदारास दि. ०३/११/२०२३ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र. १ वर माझी सही आहे. तसेच अ.क्र. २ वर श्रीकांत पाटील यांची सही आहे. तसेच पोलीस उपनिरिक्षक नरळे साहेब यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर

आहे. त्यास **नि.क्र. पी४/पीडब्ल्यू३** देण्यात येते. मला आता दि. ०३/११/२०२३ रोजीचा सुपुर्दनामा दाखविण्यात आला. सदर सुपुर्दनाम्यावर अ.क्र. १ वर माझी सही आहे. तसेच अ.क्र. २ वर पाटील यांची सही आहे. तसेच त्यावर पोलीस उपनिरिक्षक नरळे साहेब यांची सही आहे. तसेच त्यावर पोलीस पाटील त्रिंबककर यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. पी५/पीडब्ल्यू३** देण्यात येते. त्या दिवशी संध्याकाळ झाल्याने आम्ही परत घरी गेलो.

२. दुसऱ्या दिवशी आम्ही मालवण पोलीस स्टेशन येथे आलो. कृष्णा मेघ:श्याम कांदळगावकर यांनी असे सांगितले की, आम्ही ज्या ठिकाणी फिश फाईंडर, जीपीएस, वायरलेस सेट समुद्रात टाकलेले ते ठिकाण दाखवितो असे सांगितले. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशन येथून मालवण जेटी येथे गेलो. तेथे पोलीसांनी गस्ती नौका बोलविली होती. त्या बोटीतून मी, पाटील साहेब, नरळेसाहेब व कांदळगावकर गेलो होतो. आम्हाला कांदळगावकर यांनी त्यांनी फेकलेले साहित्याची जागा दाखविली. पाणी खोली जास्त असल्याने आम्ही बोटीतून समुद्रात उतरलो नाही. सबब, आम्हाला ते साहित्य काढता आले नाही. साक्षीदारास निवेदन पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अ.क्र. १ वर माझी सही आहे. तसेच अ.क्र. २ येथे पाटील यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. पी६/पीडब्ल्यू३** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**उलट तपास आरोपी क्र. १ ते ६तर्फे विधिज्ञ श्री. एस.एन.भणगे यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

३. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०४/११/२०२३ रोजी आम्हाला कोणतेही साहित्य सापडून आले नाही. मी मत्सव्यवसाय विभागामध्ये शिपाई म्हणून नोकरीस

आहे. दि. ०४/११/२०२३ रोजी निवेदन पंचनाम्याकरीता जाण्यासाठी माझ्या वरिष्ठ्ंनी मला लेखी परवानगी दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०३/११/२०२३ रोजी पंचनाम्याकरीता जाण्यासाठी माझ्या वरिष्ठांची लेखी परवानगी नव्हती.

४. हे म्हणणे खरे आहे की, समुद्रास भरती व ओहटी कधी असते ते मला माहित नाही. पोलीसांनी मला मी सरतपासामध्ये सांगितलेले कागदपत्रे सोडून दुसरे कागदपत्रे दाखविलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी इतर कागदपत्रे पाहून पडताळणी केलेली नाही.

५. हे म्हणणे खरे आहे की, मालवण येथे स्कुबा डायव्हींग स्नॉरकिंग इतर क्रिडा प्रकार आहेत. हे म्हणणे खरे आहे की, स्कुबा डायव्हींग स्नॉरकिंग हे १३ वाव खोली असलेल्या जागेमध्येच केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी स्कुबा डाईव्हरची मदत घेवून शोध घेण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी आम्ही गेलो त्या ठिकाणी चोरीच्या, पळविलेल्या व गुन्हेगारीमधील साहित्य त्या ठिकाणी टाकलेले होते असे काही दिसून आले नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, तलाशिल येथे एका बाजुला समुद्र असून दुसऱ्या बाजूला खाडी असून मधून रस्ता जातो. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या डाव्या बाजूला मच्छीमार समाजाची वस्ती आहे.

७. मी सरतपासामध्ये ज्या काही बोटी सांगितल्या त्या खाडकिनारी लावण्यात येतात. हे म्हणणे खरे आहे की, त्या बोटीवर काही गुन्हा घडला त्या बोटीवरुन दिसून येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०४/११/२०२३ रोजी

पोलीस स्टेशन येथे निवेदन घेतले व त्यानंतर जेटी मालवण येथे गेलो व त्या ठिकाणी बोटी जप्त केल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०३/११/२०२३ रोजी बोटींचा पंचनामा केला व दुसऱ्या दिवशी जावून निवेदन पंचनामा केला हे मी खोटे सांगत आहे. मी फिर्यादी कृष्णनाथ भगवान तांडेल यांना ओळखतो. त्यांचा बोटी असतात हे मला माहित आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही बोटीचा परवाना आमच्या खात्याकडूनच घ्यावा लागतो. हे म्हणणे खरे नाही की, मी मत्सखात्यात कामाला आहे तसेच कृष्णनाथ तांडेल हे माझ्या संबंधीत असल्याने मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी क्र.७ ते १२ यांचेतर्फे विधिज्ञ श्री.एन.जे.गोडकर यांचेमार्फत सुरु.**

८. मी मत्सखात्यामध्ये नोंव्हेबर २०२१ पासून नोकरीस आहे. साक्षीदार क्र. २ श्री. पाटील हे आमच्या खात्यात लिपीक म्हणून काम करतात. श्री पाटील हे आमच्या कार्यालयात लिपीक अंदाजे तीन वर्षापासून काम करत आहेत. माझी कार्यालयीन वेळ सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० अशी आहे. हे म्हणणे खरे आहे की, कार्यालयीन वेळेत कार्यालयाच्या बाहेर जाण्याकरीता वरिष्ठांची परवानगी लागते.

९. हे म्हणणे खरे आहे की, मला तळाशीलची भौगोलिक परिस्थिती सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, तळाशिल येथे आम्ही ज्या ठिकाणी गेलो त्या ठिकाणच्या चतु:सिमा मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, अक्षांश व रेखांश कोणत्या उपकरणाच्या सहाय्याने मोजतात ते मला माहित नाही. मला सर्व्हे नंबर हिस्सा नंबरचे ज्ञान आहे. सर्व्हे नंबर हिस्सा नंबर संदर्भात माझे प्रशिक्षण झालेले नाही. तळाशिल मध्ये ज्या ठिकाणी आम्ही गेलो त्या भुखंडाचा मला सर्व्हे नंबर हिस्सा नंबर सांगता येणार नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, घन:श्याम कृपा, मंडोदरी, लक्ष्मी–२८ व वैभवी–५ या बोटींचे मालक कोण आहेत याची मी कागदपत्रे पाहून खात्री केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसेच इतर मार्गाने देखील घन:श्याम कृपा, मंडोदरी, लक्ष्मी–२८ व वैभवी–५ या बोटींचे मालक कोण याची खात्री केलेली नाही. सरतपासामध्ये वर नमूद बोटींचे क्रमांक मी सांगितले आहेत ते क्रमांकांची मी कागदापत्रे पाहून खात्री केलेली नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की, मी सरकारी नोकरीत असल्याने वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०३/११/२०२३ रोजी सुपुर्दनामा केला तसेच त्यावर माझी, दुसरे पंच, पोलीस पाटील यांच्या सहया आहेत हे मी खोटे सांगत आहे.

१२. आरोपी क्र. १ ते ६ यांचेतर्फे विधिज्ञांनी घेतलेला उलट तपास आरोपी क्र. ७ ते १२ चे विधिज्ञांनी स्वीकृत केला.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह

दि. १४/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग – १ मालवण.